# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 07.03.2025** **वार-शनिवार**

---

**आर्थिक पाहणी अहवाल**

चालू आर्थिक वर्षात राज्याचा आर्थिक विकास दर ७ पूर्णांक ३ दशांश टक्के राहण्याची शक्यता आहे. कृषी आणि निगडीत क्षेत्र ८ पूर्णांक ७ दशांश, सेवा क्षेत्र ७ पूर्णांक ८ दशांश आणि उद्योग क्षेत्र ४ पूर्णांक ९ दशांश टक्क्यांनी वाढण्याची शक्यता राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालात वर्तवली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत आज हा अहवाल मांडला. या आर्थिक वर्षात राज्याचं स्थूल उत्पन्न ४५ लाख ३१ हजार ५१८ कोटी रुपये राहण्याची शक्यता आहे. तर दरडोई उत्पन्न २ लाख ७८ हजार ६८१ रुपयांवरून ११ टक्क्यांनी वाढून ३ लाख ९ हजार ३४०रुपये होण्याचा अंदाज आहे.

**तुकाराममहाराज**

संत श्रीतुकाराम महाराजांच्या वैकुंठगमनाला येत्या 16 मार्च रोजी अर्थात तुकाराम बीजेच्या दिवशी 375 वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्ताने संत श्रीतुकाराम महाराज सदेह वैकुंठगमन त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सव सोहळा साजरा होत आहे. या सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह आणि संगीत गाथा पारायण सोहळा आयोजित करण्यात आला असून, श्रीतुकाराम महाराज संस्थाननं हा मान पुणे जिल्ह्याला दिला असल्याची माहिती श्रीक्षेत्र भंडारा डोंगर संस्थानचे अध्यक्ष बाळासाहेब काशीद आणि हरिभक्तपरायण ज्ञानेश्वर माऊली कदम महाराज यांनी पत्रकार परिषदेत दिली. पुण्यातील मावळमधील भंडारा डोंगराच्या पायथ्याला हा सोहळा होईल . तुकारामबीजेच्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार तसंच अन्य अनेक मान्यवर या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती आयोजकांनी दिली.

महिलाबचतगट

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या झोपडपट्टी निर्मूलन आणि पुनर्वसन विभागातील रहिवाशांच्या सेवाकरांच्या देयकांच वितरण आणि झोपडपट्टीवासियांचे सर्वेक्षण महिला बचत गटांच्या मार्फत करण्यात येणार आहे. महिला सक्षमीकरणासाठी हा प्रकल्प उपयुक्त ठरत आहे.

**<u>आईपुरस्कार</u>**

रंगत-संगत प्रतिष्ठानतर्फे आज लेखिका, कवयित्री ललिता सबनीस यांचा आदर्श आई पुरस्काराने गौरव करण्यात आला. आदर्श आई पुरस्कार हा समस्त मातृवर्गाचा सन्मान असल्याच्या भावना ललिता सबनीस यांनी यावेळी व्यक्त केल्या.

**<u>गांधी विचार संमेलन</u>**

पुण्यात आजपासून सुरू होत असलेल्या गांधी विचार साहित्य संमेलनाचं उद्घाटन राष्ट्रीय जनता दलाचे प्रवक्ते खासदार मनोजकुमार झा यांच्या हस्ते गांधी भवन, इथं होत आहे. शिळाचित्र कलाकार अनिता दुबे यांनी दगडातून साकारलेल्या गांधी जीवनदर्शनाच्या 50 शिल्पकृतीचं प्रदर्शन हे या संमेलनाचं विशेष आकर्षण असून, गांधी छायाचित्र प्रदर्शनही भरवण्यात आलं आहे. हे संमेलन तीन दिवस सुरू राहणार आहे.

**<u>अतिरिक्तआयुक्त</u>**

मुंबईतील उद्योग संचालनालयाचे अतिरिक्त विकास आयुक्त  एम. जे. प्रदीप चंद्रन यांची पुणे महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. एम. जे. प्रदीप चंद्रन यांनी यापूर्वी भंडाऱ्याचे जिल्हाधिकारी म्हणून काम केलं आहे.

**<u>रानजाई</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका वृक्ष प्राधिकरणानं रानजाई महोत्सव आणि फळ-फुले भाजीपाला प्रदर्शन आणि स्पर्धेचं आयोजन केलं आहे. याचं उद्घाटन अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या हस्ते आज करण्यात आलं. आकुर्डीच्या सेक्टर सातच्या मोकळ्या मैदानात येत्या ९ मार्चपर्यंत हे प्रदर्शन सुरू राहणार आहे. महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर टेरेस गार्डन, घरगुती रोपसंवर्धन आणि लँडस्केप डिझाइन यांसारख्या स्पर्धा घेण्यात येत आहेत.

**<u>जीबीएस</u>**

राज्यात आतापर्यंत जीबीएसचे २२४ रुग्ण आढळून आले आहेत; त्यातील १९५ रुग्णांना जीबीएसचं निदान झालं असून यातील सर्वाधिक रुग्ण पुण्यात आढळले आहेत. राज्यात जीबीएसच्या एकंदर रुग्णांपैकी २६ जणांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. १५ रुग्ण जीवरक्षक प्रणालीवर  आहेत. तर १७८ रुग्णांना उपचारानंतर रुग्णालयातून घरी सोडण्यात आलं आहे. या आजाराने आतापर्यंत ११ जणांचा मृत्यू झाला असल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली आहे.

**<u>ऊसतोडणीआंदोलन</u>**

महाराष्ट्र राज्य ऊस तोडणी मशिन मालक संघटनेनं आपल्या अनेक महत्त्वाच्या मागण्यांचं निवेदन साखर आयुक्त सिद्धराम सालीमठ यांना आज दिलं. ऊस तोडणी यंत्राचा तोडणीदर ५० टक्यांनी वाढवून देण्याच्या मुख्य मागणीसह अनेक मागण्या यात आहेत. या मागण्यांसाठी राज्यातील तेराशे मशीन

मालक येत्या १० मार्चपासून साखर संकुलासमोर बेमुदत आंदोलनाला बसणार असल्याचा इशारा संघटनेचे सचिव अमोलराजे जाधव यांनी दिला आहे.

**<u>स्वारगेटप्रकरण</u>**

स्वारगेट बस स्थानकातील महिला अत्याचार प्रकरण पुढील तपासासाठी गुन्हे शाखेकडे देण्यात आलं आहे. सुरुवातीला या प्रकरणाचा तपास स्वारगेट पोलीस ठाण्यात सुरू होता. मात्र या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी या उद्देशाने आयुक्त अमितेश कुमार यांनी हा तपास गुन्हे शाखेकडे देण्याचा निर्णय घेतला आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल ३७ तर किमान १३ पूर्णांक २ दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. उद्या किमान तापमानात किंचित वाढ होण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**